IIP: WJHSS
IIP World Journal of Humanities and Social Sciences
An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका- एक अभ्यास

**विजायकुमार शंकरराव पवार**
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*सामाजिक परिवर्तन*
*महिलांची भूमिका*

**ABSTRACT**

सामाजिक परिवर्तन सतत घडणारी प्रक्रिया आहे या प्रक्रियेत महिलांची भूमिका महत्त्वाची आहे आदिम काळापासून आजपर्यंतच्या काळापर्यंत सामाजिक परिवर्तन घडत आले आहे .कुटुंब व्यवस्था, अर्थव्यवस्था, सांस्कृतिक, राजकीय, पर्यावरण, व तंत्रज्ञान या क्षेत्रातील परिवर्तनात महिलांनी मोठे योगदान दिले आहे. परिणामी समाजात व्यापक बदल घडत आहे. हा अभ्यास भारतातील महाराष्ट्र राज्यातील ठाणे शहरातील वागळे इस्टेट विभागातील मर्यादित आहे. या अभ्यासात पर्यावरण, राजकारण, आर्थिक सशक्तिकरण, सांस्कृतिक अदान प्रदान ,आधुनिक तंत्रज्ञान या संदर्भात महिलांच्या सहभागातून होणारे सामाजिक परिवर्तन यांचे विश्लेषण केले आहे, यातून सद्यस्थितीत सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका समजून घेतली आहे.

या संशोधनासाठी 10 महिलांचा नमुना निवडून प्रश्नावलीचा वापर केला आहे. या सर्व महिला विवाहित असून शहरी विभागातील आहेत. या अभ्यासातून दिसून आले की सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका अधिक बळकट झाली आहे .शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, पर्यावरण जागृती ,सामाजिक व सांस्कृतिक भूमिका, राजकीय जाणीव व तंत्रज्ञानाचा वापर यामुळे महिलांचा आत्मविश्वास, निर्णय क्षमता, जबाबदारी, सांस्कृतिक महत्त्व ,व स्त्री पुरुष समानता वाढण्यास मदत झाली आहे. तसेच आणखी सुधारणा व्हावी म्हणून काही अभ्यासपूर्ण सूचना सुचवल्या आहेत. या संशोधनात प्रामुख्याने सकारात्मक बदलांचा अभ्यास केला आहे

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 7%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Pawar, V. S. (2025). *सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका – एक अभ्यास.* IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), **807–812**.

**प्रस्तावना:**

समाज हा सतत परिवर्तनशील असतो. परिवर्तन हे मानवी संस्कृतीचे अविभाज्य अंग आहे. मानव रानटी पाषाण अवस्थेतून विद्यमान प्रगत संस्कृतीपर्यंत वाटचाल करीत आला आहे .या सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका व सहभाग महत्त्वपूर्ण आहे. पुरुषप्रधान व्यवस्था असणाऱ्या समाजात महिलांना दुय्यम स्थान होते, पण अशा परिस्थितीत शिक्षण ,आर्थिक स्वावलंबन, कायदेशीर हक्क व आधुनिकीकरणाने त्यांना नवे सामर्थ्य प्राप्त झाले. परिणामी स्त्रियांचे सामाजिक योगदान वाढून सामाजिक परिवर्तनात जलद गतीने बदल घडून आला. महिलांनी कुटुंबाच्या जबाबदारी बरोबरच बाहेरच्या जगातील मोठ मोठ्या जबाबदाऱ्याही लीलया पेलल्या आहेत. सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका म्हणून अत्यंत महत्त्वाची आहे .

आजच्या आधुनिक कालखंडात पर्यावरण संरक्षण ,आर्थिक स्वावलंबन, सांस्कृतिक वारसा जतन, राजकीय जाणीव व डिजिटल युग या घटकांचा समाजावर मोठा प्रभाव आहे. या घटकांमध्ये महिलांची भूमिका समजून घेणे आवश्यक आहे. कारण ते आपल्या कुटुंब समाज आणि राष्ट्र विकासासाठी महत्त्वाच्या आहेत. या संशोधनात महिलांचा सहभाग फक्त कुटुंबापुरता मर्यादित नसून विविध सामाजिक स्तरावर सक्रिय असल्याचे दिसते .या संशोधनात पर्यावरण जाणीव. आर्थिक सशक्तिकरण ,राजकीय जाणीव, सांस्कृतिक वारसा जतन व डिजिटल क्रांतीतील सहभाग या घटकांचा संदर्भात अभ्यास केला आहे

**उद्दिष्टे:**

1. सामाजिक परिवर्तन म्हणजे काय समजून घेणे.
2. पर्यावरण, राजकीय ,आर्थिक, सांस्कृतिक व डिजिटल क्रांती या घटकांच्या संदर्भात महिलांची भूमिका स्पष्ट करणे .
3. सामाजिक परिवर्तनात महिलांचा सहभाग अधिक बळकट करण्यासाठी उपाय योजना सुचवणे.

**विषय विवेचन :**

1. **सामाजिक परिवर्तन:**

सामाजिक परिवर्तन ही समाजशास्त्रातील एक व्यापक आणि बहुआयामी संकल्पना आहे. सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संरचनेत फेरबदल घडवणारी प्रक्रिया. मानवाचे रीती रिवाज,आचार विचार, संस्था, संघटना, जीवनपद्धती, भोवतालचा परिसर, व्यक्ती व्यक्ती मधील वर्तन यामध्ये सतत बदल होत असतात.
सामाजिक परिवर्तन ही संकल्पना पुढील काही व्याख्यांच्या आधारे समजून घेता येऊ शकते.

मॅकआयवहर यांच्या मते, सामाजिक संबंधातील परिवर्तनाला सामाजिक परिवर्तन म्हणता येईल मूलभूत अर्थाने समाज रतनेतील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय.

अमेरिकन समाजशास्त्रज्ञ हरी जॉन्सन यांच्या मते, हे परिवर्तन जैविक सांस्कृतिक आर्थिक तांत्रिक आणि राजकीय क्षेत्रात ही घडून येते.

गीलीन आणि गीलीन यांच्या मते सामाजिक परिवर्तन म्हणजे ,"सामाजिक जीवनातील बदलांची प्रक्रिया होय ' समाज हा सतत परिवर्तनशील असतो परिवर्तन हे मानवी संस्कृतीचे अविभाज्य अंग आहे.

सामाजिक परिवर्तनाच्या कारणांमध्ये शिक्षण,आर्थिक प्रगती,औद्योगीकरण, नागरिकरण, तांत्रिक प्रगती , राजकीय चळवळी, कायदे व मूल्य व्यवस्थेतील बदल इत्यादींचा समावेश होतो. विशेषता क शिक्षण , आर्थिक स्वावलंबन,कायदे, डिजिटल क्रांती आणि लैंगिक समानतेच्या चळवळी या घटकांनी आधुनिक समाजातील परिवर्तनाची दिशा ठरवली आहे. सामाजिक परिवर्तनाच्या स्वरूपा संबंधी दोन सिद्धांत सांगितलेले आहेत एक सामाजिक परिवर्तन चक्रकार स्वरूपाचे असते, आणि दुसरे रेषाकार स्वरूपाचे असते.

**सामाजिक परिवर्तन आणि महिलांची भूमिका:**

मानव पाषाण अवस्थेपासून विद्यमान प्रगती संस्कृतीपर्यंत वाटचाल करीत आला आहे. मानवाने टप्प्याटप्प्याने विकास करून घेतला पण सामाजिक दृष्ट्या समाज हा पुरुषप्रधान वर्चस्व असलेला दिसून येतो. परंतु आधुनिक कालखंडामध्ये सामाजिक

परिवर्तनाच्या प्रक्रियेत महिलांची भूमिका सहाय्यक नसून परिवर्तनाची केंद्रबिंदू असणारी शक्ती ठरली आहे.अलीकडे शिक्षण, औद्योगिकरण, नागरिकरण ,आर्थिक स्वावलंबित्व, कायदे ,तांत्रिक प्रगती व लोकशाही मूल्यांमुळे महिलांचे सामाजिक स्थान आणि कार्यक्षेत्र लक्षणीय विस्तारले आहे. परिणामी समाजातील सामाजिक संरचनेत मूलभूत बदल घडून आले आहेत.

आर्थिक स्वावलंबन महिलांच्या सामाजिक परिवर्तन भूमिकेत एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. शिक्षणाच्या माध्यमाने महिलांनी सामाजिक परिवर्तनाला गती दिली. राजकीय क्षेत्रातील महिलांच्या सहभागामुळे सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया अधिक व्यापक झाली आहे. सांस्कृतिक आणि मूल्य परिवर्तनाच्या प्रक्रियेत महिलांची भूमिका प्रभावी आहे. तर डिजिटल क्रांतीने महिलांच्या जीवनात व जाणिवात बदल घडवून आणला आहे. सगळ्यात महत्त्वाचे पर्यावरण रक्षणात महिला केंद्रबिंदू ठरत आहेत.

थोडक्यात सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका बहुआयामी आणि परिवर्तनशील आहे. पर्यावरण, संस्कृती, राजकारण, अर्थकारण, डिजिटल क्रांती इत्यादी क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग समाजाला प्रगत आणि सर्वसमावेशक बनवण्यास मदत करतो ,त्यामुळे सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करताना महिलांची भूमिका ही अनिवार्य आणि केंद्रस्थानी असलेले दिसून येते.

2. **पर्यावरण, राजकीय ,आर्थिक, सांस्कृतिक व डिजिटल क्रांती या घटकांच्या संदर्भात महिलांची भूमिका स्पष्ट** करणे .

सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका या उद्दिष्टांचा अभ्यास करण्यासाठी प्रश्नावलीच्या माध्यमातून वरील घटकाच्या संदर्भात महिलांची भूमिका स्पष्ट करण्याचा अभ्यास केला आहे

**अ. प्रश्नावली ची ओळख:**

सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका -एक अभ्यास या संशोधनात अभ्यासासाठी एक प्रश्नावली तयार केली आहे. प्रश्नावलीत एकूण 27 प्रश्न विचारले आहेत. हे सर्व प्रश्न पर्यायातून निवडावयाचे आहेत. या प्रश्नावलीत पर्यावरण, राजकीय ,सांस्कृतिक ,आर्थिक व डिजिटल क्रांती या घटकावर प्रश्न विचारले आहेत ही प्रश्नावली एकूण दहा महिलांनी भरून दिली आहे या प्रश्नावलीच्या आधारे खाली त्याचे विश्लेषण करण्यात आले आहे

प्रतिसाद कर्त्यांचे वय

| वय. | संख्या. | टक्केवारी |
|---|---|---|
| 20 ते 29. | 01. | 10% |
| 30 ते 39. | 03. | 30% |
| 40 ते 49. | 03. | 30% |
| 50 ते पुढे. | 03. | 30% |

प्रतिसाद कर्त्यांचे शिक्षण

| शिक्षण स्तर. | संख्या. | टक्केवारी |
|---|---|---|
| प्राथमिक. | 01. | 10% |
| माध्यमिक. | 03. | 30% |
| उच्च माध्यमिक. | 01. | 10% |
| पदवी. | 04. | 40% |
| पदव्युत्तर पदवी. | 01. | 10% |

प्रतिसाद कर्त्यांचा व्यवसाय

| व्यवसाय. | संख्या. | टक्केवारी |
|---|---|---|
| गृहिणी. | 04. | 40% |
| व्यवसाय | 01. | 10% |
| नोकरी. | 05. | 50% |

**ब. प्रश्नावली वरील आधारित विश्लेषण**

**पर्यावरण व महिलांची भूमिका**

1.पर्यावरण संरक्षण माहिती- 80%

2.प्लास्टिक वापर कमी करणे -100%

3.पर्यावरण संवर्धनात महिलांची भूमिका- 100%

4.कचरा व पाणी बचतीत महिलांची भूमिका -कचरा 50% व पाणी बचत 40%

वरील माहिती भरून लक्षात येते की, प्लास्टिकचा वापर व पर्यावरण संवर्धनात महिलांची भूमिका 100% म्हणजे महत्त्वपूर्ण आहे . तर कचरा व्यवस्थापन व पाणी बचतीत महिलांची भूमिका स्पष्ट दिसून येते.

**महिला व सांस्कृतिक भूमिका:**

1.सांस्कृतिक परंपरेत सहभाग- 70%

2.संस्कृती मूल्य प्रोत्साहन- 100%

3.सांस्कृतिक कार्यक्रमाचे स्त्री पुरुष समानता वाढते- 100%

4.परंपरा जपणे व पुढे नेणे -70%

सांस्कृतिक कार्यक्रम व सांस्कृतिक मूल्य प्रोत्साहनामध्ये महिलांची 100% भूमिका दिसून येते .यामुळे स्त्री पुरुष समानता वाढण्यास मदत झाली .परंपरा जपण्यात व पुढे नेण्यात महिला अग्रेसर असल्याचे दिसते.

**महिला व राजकीय भूमिका**

1.स्थानिक लोकप्रतिनिधी ची माहिती- 100%

2.राजकीय नेतृत्वानेसामाजिक बदल-100%

राजकीय सहभागाने सामाजिक स्थितीत सुधारणा- 100%

3.राखीव जागांची उपयुक्तता- 50%

4.मतदानात स्वतःचा निर्णय- 100%

वरील विश्लेषणातून लक्षात येते की ,राजकीय दृष्ट्या महिला ची जाणीव चांगली आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींची माहित मतदानात स्वतःचा निर्णय व राजकीय सहभागाने सामाजिक सुधारणा होण्यावरचा विश्वास सामाजिक परिवर्तन दाखवतो. महिला राजकीय दृष्ट्या सक्षम असल्याचे दिसून येते

**महिला व आर्थिक भूमिका**

1.स्वतःच्या आर्थिक उत्पन्न -60%
2.आर्थिक स्वावलंबनाने सामाजिक दर्जा वाढतो- 100%
3.कुटुंबात आर्थिक योगदान नोकरी व स्वयंरोजगार- 80%
आर्थिक स्वातंत्र्याने सामाजिक बदल -100%

वरील विश्लेषणातून लक्षात येते की, समाजात महिला स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक दर्जा वाढतो यावर त्यांचा विश्वास दिसतो .कुटुंबात त्यांचे आर्थिक योगदान आहे .आर्थिक स्वावलंबनाने त्यांचा आत्मविश्वास निर्माण झालेला दिसतो .

**महिला व डिजिटल क्षेत्र:**
1.डिजिटल साक्षरता व सामाजिक प्रगती- 100%
2.ऑनलाइन रोजगार आणि आर्थिक भूमिका वाढते- 90%
3.स्मार्टफोनचा वापर- 90%
4.सोशल मीडियामुळे सामाजिक जागृतीत वाढ- 100%

आधुनिक काळातील स्त्रियांनी डिजिटल क्रांतीचा योग्य वापरून केल्याचे दिसते. रोजगार निर्मिती व आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्यास त्यांना मदत झाली. तसेच सामाजिक जागृती वाढ होण्यास सोशल मीडियाचा वापर दिसून येतो. महिला नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यात पुढे आल्या आहेत.

**क. व्याप्ती व मर्यादा :**

1. येथील संशोधन ठाणे शहरातील वागळे इस्टेट विभाग या भागातील महिलांवर आधारित आहे .
2. अभ्यासाचा केंद्रबिंदू सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका हा आहे.
3. संशोधन पुढील पाच घटकावर केंद्रित आहे पर्यावरण ,राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, व डिजिटल क्रांती.

**मर्यादा :**

1.वरील संशोधन निवडलेल्या क्षेत्रफळ ते मर्यादित असल्याने निष्कर्ष सर्वत्र लागू होतीलच असे नाही.
2.नमुना आकार मर्यादित आहे.
3.काही महिला सामाजिक दबाव किंवा संकोच यामुळे पूर्ण माहिती देऊ शकत नाहीत.

**ड. संशोधन पद्धतीशास्त्र :**

1.वर्णनात्मक
2.विश्लेषणात्मक

**इ. संदर्भ साधने:**

प्राथमिक व दुय्यम साधने

**ई. नमुना निवड :**

महिलांचे वय, शिक्षण ,व्यवसाय, कुटुंब प्रकार व शहरी विभाजन वर आधारित आहे

**उ' नमुना आकार :**

10 महिला

**ऊ, माहिती संकलन साधने :**

1. प्रश्नावली
2. डेटा विश्लेषण पद्धती

**निष्कर्ष :**

1. महिलांचा सामाजिक परिवर्तनातील सहभाग सातत्याने वाढत आहे.
2. पर्यावरण संवर्धनात महिलांचे योगदान महत्त्वाचे आहे .
3. आर्थिक स्वावलंबूनाने महिलांच्या सामाजिक स्थानात बदल झाला आहे .
4. सांस्कृतिक विकासात महिलांचे मूलभूत योगदान आहे .
5. राजकीय जाणीवचांगली प्रगती दर्शवत आहे.
6. तांत्रिक व डिजिटल साधनांनी महिलांचे जीवन सुकर बनवले आहे.
7. संपूर्ण समाजाचा विकास हा महिलांच्या सहभागाशिवाय अपूर्ण आहे.

**3. उपाय योजना :**

महात्मा गांधी म्हणाले होते,' तुम्ही महिलांच्या व्यक्तित्व विकासासाठी संधी द्या ,त्यांना चार भिंतीच्या आत ठेवण्यापेक्षा प्रगती करण्याची संधी द्या, मग देशाच्या विकासाला उशीर होणार नाही'

1. पर्यावरण संरक्षणात त महिलांची भूमिका पाहता पर्यावरण संरक्षणासाठी महिलांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे .
2. आर्थिक स्वालंबन वाढवण्यासाठी शासनाची मदत व रोजगार उपलब्ध करून द्यावे स्वयंसहायता गट महिला उद्योजकता स्टार्टअप यासाठी सरकारी मदत द्यावे.
3. राजकीय पदे प्राप्त होण्यासाठी महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी क्षमता विकास व नेतृत्व प्रशिक्षण कार्यक्रम राबवावा .
4. व्यावसायिक प्रशिक्षणाची उपलब्धता वाढवावी
5. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या वाढीमुळे स्त्री पुरुष समानता कमी होत असल्याने त्यास प्रोत्साहन द्यावे.
6. महिलांना गुणवत्तापूर्ण व कौशल्य आधारित शिक्षण उपलब्ध करून द्यावे.

**संदर्भ साधने :**

1. मराठी विश्वकोश ,खंड 19, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई. 2012. पृष्ठ 248.
2. मराठी विश्वकोश ,खंड 19, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई .2012. पृष्ठ 249 .
3. मराठी विश्वकोश, खंड 19, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई .2012 .पृष्ठ 250.
4. ज्ञान विकास संग्रह, भाग चार, सोनिया यादव, मार्क पब्लिशर्स ,जयपुर .प्रथम संस्करण, 2020 पृष्ठ 148.